# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक यांचा शहरात ठिकठिकाणी पाहणी दौरा**

आज दिनांक 20 डिसेंबर 2024 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी मिरा रोड स्टेशन पे अँड पार्क, मिरा रोड भाजी मार्केट, इंदिरा गांधी रुग्णालय, भाईंदर पश्चिम येथील बस डेपो जागा व बंदरवाडी स्मशान भूमी याठिकाणी स्थळ पाहणी करून आढावा घेतला. सदर पाहणी दरम्यान अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, शहर अभियंता दिपक खांबित, कार्यकारी अभियंता, स्वच्छता निरीक्षक व कनिष्ठ अभियंता उपस्थित होते.

सकाळी 7.30 वाजल्यापासून सुरू असलेल्या पाहणी दरम्यान मा. आयुक्त यांनी सर्व ठिकाणी नियमितरीत्या स्वच्छता ठेवण्याच्या सूचना संबधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या. मिरा रोड स्टेशन येथील पे अँड पार्क ठिकाणी स्वच्छता ठेवण्याची मा. आयुक्त यांनी ठेकेदारास सक्त ताकीद दिली. परिसरात अस्वच्छता दिसल्यास संबधित ठेकेदारावर कारवाई करण्याचे आदेश स्वच्छता अधिकाऱ्यांना दिले. इंदिरा गांधी रुग्णालयातील तिसरा व चौथ्या मजल्यावरील बांधकामाची मा. आयुक्त यांनी पाहणी केली. कार्यादेश दिल्याप्रमाणे ठेकेदाराने कामे पूर्ण केली आहेत की नाही याबाबत मा. आयुक्त यांनी आढावा घेतला. तसेच रुग्णालयातील स्वच्छतेबाबत आयुक्त यांनी समाधान व्यक्त केले. भाईंदर पश्चिम येथील बस डेपो जागेची पाहणी करताना आयुक्त यांनी जागेबाबत लवकरात लवकर आवश्यक ती कारवाई करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. बंदरवाडी स्मशानभूमी येथे पाहणी करताना आयुक्त यांनी स्मशानभूमी परिसरातील नीटनेटकेपणा व स्वच्छता पाहून समाधान व्यक्त केले व तेथील कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. तसेच स्मशानभूमीत उपलब्ध असलेली पाणपोई व्यवस्था स्वच्छ किंवा दुरुस्त करून घेण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.